# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषयः- पाणी पृथकरण या लेखाशिर्षात तरतूदीचे पुर्नविनियोजन करणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.प्रशासक तथा आयूक्त सो. यांचे अधिकार आहेत. त्याचप्रमाणे याअधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दर वर्षी उत्पन्न व खर्चयांचे अंदाजपत्रक तयार केले जातात. सन २०२३ - २०२४ या आर्थीक वर्षात उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थीक तरतूद करण्यांत आली होती. या तरतूदीमधून आतापर्यत खर्च करण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे नमूद आहे. (आकडे लाखात)

| अ.क्र | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | सन २०२३-२४ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च | शिल्लक | पुर्नविनियोजन |
|---|---|---|---|---|---|
| १ | **पाणी पृथीकरण** | ५३.५० लक्ष | ४८.३१ लक्ष | ५.१९ लक्ष | २० लक्ष |
| | **एकुण** | **५३.५० लक्ष** | **४८.३१ लक्ष** | **५.१९ लक्ष** | **२० लक्ष** |

सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात जो अर्थसंकल्प मंजूर झाला त्या अर्थसंकल्पामध्ये **पाणी पृथीकरण**विशेष बाब या सोईच्या दृष्टीने शहरातील नागरीकांना शुध्द पाणी पुरवठा होणेकरीता निधी अभावी प्रस्ताव प्रलंबित आहेत. सदर लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजनाच्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूदी व विशेषः व कलम ४५२ (अ) च्या कलम (१ब) नुसार मा.प्रशासक तथा आयुक्त सो यांनी दिनांक ०२/०६/२०२३ रोजी मान्यता मिळालेली आहे.

शासन आदेश क्र.एम.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ रोजी नुसार मा.महासभा व मा स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियक्त करण्यात आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक मा.आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता पाणी पृथकरण या लेखाशिर्षात रुपये ५३.५० लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. यापुर्वी मनपाचे गौतम कंम्पाउंड, नवीवस्ती येथे एकच क्लोरीनेशन प्लॅन्ट कार्यान्वीत होता सद्या पोंगाव,शांतीनगर नुरीनगर, आझाद नगर,व-हाळदेवी जलशुध्दीकरण केंद्र अशी एकुण ५ नव्याने क्लोरीनेशन प्लॅन्ट कार्यान्वीत करण्यात आलेले आहेत. क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्ये पाण्याची शुध्दीकरण प्रक्रिया करणे करीता क्लोरीनेशन गॅस सिलेंन्डर पुरविणे कामीच्या खर्चात वाढ झालेली असल्यामुळे या तरतुदीमधुन रु.४८.३१ लक्ष तरतुद खर्च झालेली आहे. उर्वरित रु.५.१९ तरतुद शिल्लक आहे.

सन २०२२-२३ मध्ये व-हाळदेवी वॉटर वर्क्स येथे नवीन क्लोरीनेशन प्लॅन्ट बसविण्यात आल्यामुळे ठेकेदार यांचे रुपये ७.२८ लक्ष देयक अदा करण्याचे प्रलंबित आहे.तसेच भिवंडी शहरातील दररोज विविध प्रभागातुन पाणी नमुने तपासणी करीता मा.मुख्य अणुजिव शास्त्रज्ञ जिल्हा आरोग्य प्रयोग शाळा ठाणे, यांच्याकडे पाठविले जातात त्याचे सन २०२२-२३ चे रु.११.८० लक्ष देयक प्रलंबित आहे. अशी एकुण रु.२० लक्ष निधी अभावी प्रस्ताव प्रलंबित आहेत. त्यामुळे पाणी पृथकरण या लेखाशिर्षात रु.२० लक्ष पुर्नविनियोजन करण्याचे आवश्यकता आहे.

सन २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात एकात्मिक पाणी पुरवठा योजना यालेखाशिर्षकात रु.२२४.७२ लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. या तरतुदी मधुन आता पर्यंत रु. ८५.२२ लक्ष खर्च झालेला आहे. उर्वरित रु. १३९.४६ लक्ष तरतुद शिल्लक आहे. या तरतुदी मधुन पाणी पृथकरण या लेखाशिर्षात रु.२० लक्ष पुर्नविनियोजन करणेकरीता पाणी पुरवठा विभागाकडून प्रस्तावित करण्यात येत आहे.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** 265 **दिनांक :** 06/10/ **२०२३**

पाणी पृथकरण या लेखाशिर्षात तरतूदीचे पुर्नविनियोजन करणेकामी प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागातील मंजूर तरतुदी मधील पाणी पृथ्करण या लेखाशिर्षात तरतुदीचे पुर्नविनियोजन करणेकामी मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि. शहर महानगरपालिका, भिवंडी.**

ok

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषयः- पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे या लेखाशिर्षात तरतूदीचे पुर्नविनियोजन करणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.प्रशासक तथा आयूक्त सो. यांचे अधिकार आहेत. त्याचप्रमाणे याअधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दर वर्षी उत्पन्न व खर्चयांचे अंदाजपत्रक तयार केले जातात. सन २०२३ - २०२४ या आर्थीक वर्षात उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थीक तरतूद करण्यांत आली होती. या तरतूदीमधून आतापर्यंत खर्च करण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे नमूद आहे. (आकडे लाखात)

| अ.क्र | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | सन २०२३-२४ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च | शिल्लक | पुर्नविनियोजन |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाणी पुरवठा साहित्या खरेदी व बसविणे | १२५.३२ लक्ष | ११८.७१ लक्ष | ६.६१ लक्ष | २५.०० लक्ष |
| | एकुण | १२५.३२ लक्ष | ११८.७१ लक्ष | ६.६१ लक्ष | २५.०० लक्ष |

सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात जो अर्थसंकल्प मंजूर झाला त्या अर्थसंकल्पामध्ये पाणी पुरवठा साहित्या खरेदी व बसविणे विशेष बाब या सोईच्या दृष्टीने शहरातील नागरीकांना शुध्द पाणी पुरवठा होणेकरीता निधी अभावी प्रस्ताव प्रलंबित आहेत. सदर लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजनाच्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूदी व विशेषः व कलम ४५२ (अ) च्या कलम (१ब) नुसार मा.प्रशासक तथा आयुक्त सो यांनी दिनांक ०२/०६/२०२३ रोजी मान्यता मिळालेली आहे.

शासन आदेश क्र.एम.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ रोजी नुसार मा.महासभा व मा स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१ अ) (१ ब) मधील तरतूदीनुसार निविदा विषयक मा.आयुक्त तथा प्रशासक यांना आहेत.

शहरातील अस्थितत्वात असलेल्या जलवाहिन्याची निगा व दुरुस्ती, घाण पाण्याच्या तक्रारी, मुख्य रस्त्यावरील पाण्च्याच्या गळत्या काढणे आवश्यक व तातडीचे असल्याने जे.सी.बी.ची आवश्यकता भासते शहरातील वेगवेगळ्या प्रभागातुन जुने नवीन पाईप बोरवेल, साहित्य नेह आण करावे लागते त्यामुळे वाहनाची आवश्यता भासते तसेच जलवाहिनी वरील गलत्या काढणे करीता वेल्डींग मशिन लागते त्यामुळे पाईप व बोरवेल दुरुस्ती करीता वाहन व यंत्र सामुग्री भाडे तत्वावर पुरविले जाते. सन २०२३-२४ या वर्षाकरीता पाणी पुरवठा साहित्य खरेदी बसविणे कामी निगा दुरुस्ती कामी रु. १२५.३२ तरतुद करण्यात आलेली आहे. या तरतुदीमधुन रु. ११८.७१ खर्च झालेला आहे. उर्वरित रु.६.६१ तरतुद शिल्लक आहे. सन २०२३-२४ या वर्षाकरीता साहित्य खरेदी बसविणे व निगा दुरुस्ती कामी वाहन व्यवस्था व यंत्रसामुग्री भाडेतत्वावर पुरविणे कामी रु. २३९९४९३/- मात्रची निविदा काढण्यात आलेली आहे. तरतुद उपलब्ध नसल्यामुळे सदरचा प्रस्ताव प्रलंबित आहे. क्ष्यामुळे पाणी पुरवठा साहित्य खरेदी बसविणे निगा दुरुस्ती करिता रु. २५ लक्ष तरतुद आवश्यक आहे.

सन २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात एकात्मिक पाणी पुरवठा योजना यालेखाशिर्षकात रु.२२४.७२ लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. या तरतुदी मधुन आता पर्यंत रु. १५५.२२ लक्ष खर्च झालेला आहे. उर्वरित रु. ६९.५० लक्ष तरतुद शिल्लक आहे. या तरतुदी मधुन पाणी पुरवठा साहित्य खरेदी बसविणे व निगा दुरुस्ती या लेखाशिर्षात रु.५० लक्ष पुर्नविनियोजन करणेकरीता पाणी पुरवठा विभागाकडून प्रस्तावित करण्यात येत आहे.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** २६६ **दिनांक :** ०६/१० **/ २०२३**

पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे या लेखाशिर्षात तरतूदीचे पुर्नविनियोजन करणेकामी प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२) नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागातील मंजूर तरतुदी मधील साहित्य खरेदी व बसविणे या लेखाशिर्षात तरतूदीचे पुर्नविनियोजन करणेकामी मान्यता देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि. शहर महानगरपालिका, भिवंडी.**